# भिवंडी निजामपूर शहर महागनरपालिका, भिवंडी.

**विषय :- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभाग अंतर्गत महिला व बाल कल्याणार्थ सन २०२४ – २५ मध्ये करावयाच्या कामांना मान्यता मिळणेबाबत.**

संदर्भ :-१) शासन निर्णय क्रमांक – एमयुएम- २०२१/प्र.क्र.३८५/नवि -१७ दिनांक २९ मार्च २०२२.

**प्रस्तावना**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये महिला व बाल कल्याण या शिर्षकाखाली सन २०२४-२५ करीता रु. ५२.९४ लक्ष इतका निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे. सदर निधी अंतर्गत सन २०२४-२५ मध्ये विविध योजना व विविध कामे करावयाची आहेत.

परंतु महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये महिला व बाल कल्याण या शिर्षकाखाली सन २०२४-२५ करीता ठेवण्यात आलेल्या राखीव निधीमधुन उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयात दिलेल्या विवरणपत्र अ व ब मध्ये नमूद केलेल्या सर्व योजना/ कार्यक्रम/ कामे करणे शक्य नाही. उपलब्ध निधीमधुन खालीलप्रमाणे कामांचे नियोजन करण्यात आले आहे.

| अ.क्र | योजना व कामे | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | महिलांसाठी समुपदेशन केद्र/ हेल्पलाईन /विधी सल्ला केंद्र चालविणे. (एक समुपदेशन केंद्र दोन समुपदेशकांसह बारा महिन्यांकरीता चालविणे.) | रु. ५,००,०००/- |
| २ | ३ जानेवारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करणे | रु. ३,००,०००/- |
| ३ | सार्वजनिक ठिकाणी महिलांना बसण्याकरीता बेंचेस, व्यायाम साहित्य व लहान मुलांकरीता खेळणी बसविणे. | रु. ५,००,०००/- |
| ४ | वैद्यकीय विभागांच्या नागरी सुविधा केंद्राकरीता विविध साहित्य खरेदी करणेबाबत. | रु. १०,००,०००/- |
| ५ | महानगरपालिका नागरी आरोग्य केंद्र व महानगरपालिका आस्थपनेवर काम करणाऱ्या एकुण ११०४ महिला यांचेकरीता वैद्यकिय आरोग्य विभाग व आस्थापना विभाग यांचे मागणीनुसार दरमहा १० नग सॅनिटरी नॅपकीन याप्रमाणे १२ महिन्यांकरीता सॅनिटरी नॅपकीन खरेदी करणे. सदर सॅनिटरी नॅपकीन हे नागरी आरोग्य केंद्र, मनपा मुख्यालय, प्रभाग कार्यालये या ठिकाणी बसविण्यात आलेल्या वेडींग मशिन च्या माध्यमातुन उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. | रु. ६,००,०००/- |
| ६ | ८ मार्च जागतिक महिला दिन साजरा करणे | रु. ५,००,०००/- |
| ७ | महिला बचत गटांना व्यावसायाकरिता शिलाई मशिन / घरघंटी / पापड मशिन / मिरची कांडप मशिन / मसाला ग्राइंडर / शेवया मशिन यासारख्या मशिनसाठी अर्थसहाय्य देणे | रु. १०,००,०००/- |
| ८ | अनैतिक व्यापारातुन बाहेर पडू इच्छिणाऱ्या महिला / मुली यांच्याकरीता त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने पूनर्वसनाची योजना राबविणे | रु. ५,००,०००/- |
| ९ | स्थानिक परिस्थितीनुसार आवश्यक असलेल्या योजना अंमलात आणणे/शासननिर्णय व परिपत्रक निर्गमित केल्यानुसार आयत्यावेळी योजना राबविणे. | रु. ३,९४,०००/- |
| | | **रु. ५२,९४,०००/-** |

महानगरपालिका अर्थसंकल्पामध्ये महिला व बाल कल्याण करीता राखीव असलेल्या निधीतून वरीलप्रमाणे योजना/कार्यक्रम/ कामे करणेकरिता महिला व बाल कल्याण समितीची शिफारस आवश्यक आहे. परंतु आपल्या महानगरपालिकेमध्ये सदर समिती अस्तित्वात नसल्याने तसेच सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या सदस्यांचीदेखील मुदत संपली

असल्याने महासभा सुध्दा होणे शक्य नाही. महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक झाल्यानंतर महिला व बाल कल्याण समिती अस्तित्वात येऊ शकेल अथवा महासभा होऊ शकेल. परंतु याकामी विलंब असल्याने सन २०२४-२५ या वर्षातील योजना व कामे करणेकामी मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांच्या अधिकारात मान्यता घेण्यात येवून प्रशासकिय ठराव करण्यात यावा असे मत आहे. तरी मान्य असल्यास स्वाक्षरीस्तव व मा. प्रशासक यांचा ठराव घेणेकामी सविनय सादर.

**ठराव क्रमांक :-** ५९३ **दिनांक :-**३० /०९ /२०२४

राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायतीम यामध्ये महिलांकरता विविध योजना राबवण्यासाठी महिला व बाल कल्याण समिती अस्तित्वात असून बदलत्या परिस्थितीनुसार बऱ्याच योजना कार्यक्रम कामांमध्ये बदल सुधारणा करणे आवश्यक आहे. तसेच महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायतीमध्ये योजनांची तरतूद असून ही महिला व बालकल्याणाच्या योजनांवर खर्ची पडत नाही. या सर्व बाबी लक्षात घेऊन महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती यामध्ये वार्षिक एकूण उत्पन्न पैकी बांधील खर्ची वजा जाता राहिलेल्या निव्वळ महसुलातील ५% रक्कमे मधून राबविण्याच्या महिला व बालकल्याणाच्या योजना/कार्यक्रम/कामे शासन निर्णय क्रमांक – एमयुएम-२०२१/प्र.क्र.३८५/नवि-१७, २९ मार्च २०२२ रोजी नुसार मार्गदर्शक सूचना दिलेल्या असून त्यानुसार विवरण पत्र "अ" भागात महिला सक्षमीकरणासाठी नागरी भागात अंमलबजावणी करावयाच्या योजना आणि विवरणपत्र "ब" बालकांकरीता नागरी भागात अंमलबजावणी करावयाच्या योजना राबविण्यात शासनाने मान्यता दिलेली आहे.

महानगरपालिका अर्थसंकल्पामध्ये महिला व बाल कल्याण या शीर्षकाखाली सन २०२४-२५ करिता ठेवण्यात आलेल्या ५% राखीव निधी मधून शासन निर्णयात दिलेल्या विवरणपत्र "अ" व "ब" मध्ये नमूद केलेल्या सर्वच योजना/कार्यक्रम/कामे करणे शक्य नाही तरी त्यामधील व त्या व्यतिरिक्त इतर आवश्यक योजना/कार्यक्रम/कामे सन २०२४ - २५ मध्ये करणे कामी खालील प्रमाणे नियोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभागाअंतर्गत महिला व बालकल्याणकरिता सन २०२४ - २५ मधील अर्थसंकल्पातील राखीव तरतुदीनुसार ५% निधी मधून खालील प्रमाणे नमूद केलेनुसार कामांचे नियोजन करण्यात आले आहे.

| अ.क्र | योजना व कामे | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | महिलांसाठी समुपदेशन केद्र/ हेल्पलाईन /विधी सल्ला केंद्र चालविणे. (एक समुपदेशन केंद्र दोन समुपदेशकांसह बारा महिन्यांकरीता चालविणे.) | रु. ५,००,०००/- |
| २ | ३ जानेवारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करणे | रु. ३,००,०००/- |
| ३ | सार्वजनिक ठिकाणी महिलांना बसण्याकरीता बेंचेस, व्यायाम साहित्य व लहान मुलांकरीता खेळणी बसविणे. | रु. ५,००,०००/- |
| ४ | वैद्यकीय विभागांच्या नागरी सुविधा केंद्राकरीता विविध साहित्य खरेदी करणेबाबत. | रु. १०,००,०००/- |
| ५ | महानगरपालिका नागरी आरोग्य केंद्र व महानगरपालिका आस्थपनेवर काम करणाऱ्या एकुण ११०४ महिला यांचेकरीता वैद्यकिय आरोग्य विभाग व आस्थापना विभाग यांचे मागणीनुसार दरमहा १० नग सॅनिटरी नॅपकीन याप्रमाणे १२ महिन्यांकरीता सॅनिटरी नॅपकीन खरेदी करणे. सदर सॅनिटरी नॅपकीन हे नागरी आरोग्य केंद्र, मनपा मुख्यालय, प्रभाग कार्यालये या ठिकाणी बसविण्यात आलेल्या वेडींग मशिन च्या माध्यमातुन उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. | रु. ६,००,०००/- |
| ६ | ८ मार्च जागतिक महिला दिन साजरा करणे | रु. ५,००,०००/- |
| ७ | महिला बचत गटांना व्यावसायाकरिता शिलाई मशिन / घरघंटी / पापड मशिन / मिरची कांडप मशिन / मसाला ग्राइंडर / शेवया मशिन यासारख्या मशिनसाठी अर्थसहाय्य देणे | रु. १०,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ८ | अनैतिक व्यापारातुन बाहेर पडू इच्छिणाऱ्या महिला / मुली यांच्याकरीता त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने पूनर्वसनाची योजना राबविणे | रु. ५,००,०००/- |
| ९ | स्थानिक परिस्थितीनुसार आवश्यक असलेल्या योजना अंमलात आणणे/शासननिर्णय व परिपत्रक निर्गमित केल्यानुसार आयत्यावेळी योजना राबविणे. | रु. ३,९४,०००/- |
| | | **रु. ५२,९४,०००/-** |

**मला प्राप्त महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एमसीओ २०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) नवी-१४, दिनांक ६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेष: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, विभाग प्रमुख (समाज कल्याण), उपायुक्त (समाज कल्याण), व अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार उपरोक्त योजना/कार्यक्रम/कामे सक्षम मान्यतेने अटी व शर्तीनुसार उपयुक्त कामे करणेकामी आवश्यकतेनुसार प्रस्ताव सादर करून त्यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता घेण्यात येईल.**

**तसेच यानुसार महानगरपालिका अर्थसंकल्पामध्ये महिला व बालकल्याण विभागाकरिता राखीव असलेल्या निधीतून सदरची कामे करणे कामी उक्त शासन निर्देशानुसार व नमूद अटी शर्तीस अधिन राहून प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.**

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका